'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## निविदा सूचना

कबचौउम विद्यापीठाच्या **'जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटी साठीची निविदा'** नोंदणीकृत पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

त्यासंबंधीची कोरी निविदा संपूर्ण माहिती, अटी व शर्तीसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **(Website: www.nmu.ac.in)** उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मान्यताप्राप्त ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी/पुर्नवापराचा पर्यावरण आणि वन मंत्रालय केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेले वैध नोंदणी प्रमाणपत्र व पर्याप्त अनुभव असलेल्या नोंदणी प्रमाणपत्र धारकांनी सदरची निविदा विद्यापीठ संकेतस्थळावरून डाऊनलोड करुन परिपुर्ण भरलेली सिलबंद निविदा **दि.१३/०८/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी **विद्यापीठाच्या वित्त विभाग, कबचौउमवि, जळगाव** येथे जमा करावी.

सदर सिलबंद निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ दिल्यास अथवा शुध्दीपत्रक निर्गमित केल्यास त्या संबंधीची सूचना फक्त विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

जाक्र.: कबचौउमवि/०८/पी-०२ /ई-कचरा निविदा/४१४/२०२५ (सीए रवींद्र एन. पाटील)
दिनांक :२३/०७/२०२५ **वित्त व लेखा अधिकारी**

cb

|| अंतरी पेटवू ज्ञा-ज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon

वित्त (साठा व अभिलेख) विभाग

# जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

भाग 01 ते 04

**पेजेस** - 01 **ते** 14

(**भाग**- 1 **ते** 3 **पा.क्र.** 1 **ते** 11 )

(**भाग**- 4 **पा.क्र.** 12 **ते** 14 )

दुरध्वनी क्रमांक :- 0257- 2257236, 237,285

विद्यापीठ संकेतस्थळ :- www.nmu.ac.in

जा. क्र. : कबचौउमवि/8/पी-02/ई-कचरा निविदा/414/2025, दि. 23.07.2025

**निविदा स्विकारण्याची अंतिम दि**. 13/08/2025

किंमत रु.4,000/-

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

**विद्यापीठाचा पुर्वइतिहास** :-

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावची स्थापना दि.15ऑगस्ट,1990 रोजी झालेली आहे. सन 1991-1992 पासून विद्यापीठाचे शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज सुरु झालेले आहे. विद्यापीठास सन 1991 मध्ये 2(F) आणि 1994 मध्ये 12(B) नुसार विद्यापीठ अनुदान आयोग (University Grant Commission) कायदा 1956 अंतर्गत मान्यता मिळालेली आहे. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र जळगाव, धुळे व नंदुरबार या 3 जिल्ह्यांच्या भौगोलिक कार्यक्षेत्रात विस्तारले आहे. ग्रामीण व आदिवासी बहुल भागातील या विद्यापीठास खान्देश प्रदेशातील पूर्व- आदिवासी आणि ग्रामीण क्षेत्रातील बहुतेक पहिल्या पिढीतील शिकणाऱ्यांसाठी स्थापनेपासूनच उच्च शिक्षणाचे दरवाजे उघडले आहेत. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी उत्तम दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता राखणे, उत्कृष्टता शैक्षणिक नियोजन, विद्यार्थ्यांना कौशल्यात्मक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराभिमुख राबविणे व विद्यार्थी हितासाठी चांगले प्रयत्न करणे इ.महत्त्वाची क्षेत्रे ठरविली आहेत.

**निविदेचा उद्देश** :-

विद्यापीठाच्या कार्यालयाच्या स्थापनेपासून ते आजमितीपर्यंत संकलीत केलेले जुने, कालबाह्य,वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी खालील पात्रता व निकषांची पुर्तता करणाऱ्या आस्थापना/निविदाधारकांकडून निविदा मागविण्यात येत आहे. त्यासाठी ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी/पुनर्वापराचा पर्यावरण आणि वन मंत्रालय (MOEF) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेले वैध नोंदणी प्रमाणपत्र व पर्याप्त अनुभव असलेल्या केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार "**ज्या स्थितीतील आहे तश्याच स्थितीतील**" निविदेच्या भाग-3 मध्ये नमुद केलेल्या वर्णनाबरहुकूम साहित्याची विल्हेवाट लावण्यासाठी इच्छुक असलेल्या निविदाधारकांनी सदरच्या निविदेत सहभाग नोंदवावयाचा आहे.

त्यासाठी विद्यापीठाच्या उमविनगर परिसरात जुने, कालबाह्य,वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंचे संकलन करण्यात आलेले आहे. त्यासाठी प्रस्तुत निविदेच्या भाग- 1 ते 3 मध्ये नमुद ई-कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी भाग-4 मध्ये कमाल दर (H-1) सादर करणाऱ्या निविदाधारकाने स्वखर्चाने सदरचे साहित्य नेण्याची कार्यवाही करावयाची आहे.

त्यासाठी खालील निविदा अटी व शर्ती मान्य असल्यास विहीत शुल्क व नमुद केलेल्या कालावधीत निविदा सादर करण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

## भाग-1 निविदाधारकाची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | निविदा सुचना संदर्भ व तारीख | :- | जा. क्र. : कबचौउमवि/8/पी-02/ई-कचरा निविदा/ /2025, दि. .05.2025 |
| 2) | पुरवठादाराचे नांव व संपूर्ण पत्ता | :- | |
| 3) | दुरध्वनी, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी | :- | |
| 4) | व्यवसायातील अनुभव | :- | |
| 5) | शॉप ॲक्ट/ उद्यम रजिष्ट्रेशन क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 6) | जी.एस.टी. (GST) नोंदणी क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 7) | पॅन कार्ड क्रमांक (स्वाक्षांकीत प्रत जोडावी) | :- | |
| 8) | मागील तीन वर्षाची वार्षिक उलाढाल पत्रके (लेखापत्रक जोडणे आवश्यक) IT Acknowlegement, Balance Sheet & Profit Loss Statement. | :- | |
| 9) | निविदा किंमत व बयाणा रक्कमेचे धनाकर्ष क्रमांक, तारीख अथवा ऑनलाईन भरणा केल्याची पावती जोडावी. | :- | |
| 10) | सध्या कोणकोणत्या संस्थांना निविदेतील नमूद साहित्याचे विल्हेवाट केलेली आहे त्याचा तपशिल (सोबत ग्राहकांची यादी जोडावी- (List of Client) | :- | |
| 11) | ई- कचऱ्याचे संकलन,विल्हेवाट,विघटन, पुनर्वापरसाठी वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | :- | |
| 12) | निविदा सादर करणाऱ्या फर्मचे कंपनी कायदा,2014 (2013चा 18) उपकलम 7च्या उपकलम (2) आणि 8च्या उप कलम (1) अंतर्गत नोंदणीकृत खाजगी मर्यादित फर्म असावा किंवा भारतीय कंपनी कायदा,1956 किंवा भारतीय कंपनी कायदा,2013 नुसार भारतातील कंपनी असावी. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 13) | ई-कचाऱ्याचे संकलन, विघटन आणि पुनर्वापरासाठी सद्याच्या आवश्यकतेनुसार पर्यावरण आणि वन मंत्रालय (MOEF) केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ/राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेले वैध नोंदणी प्रमाणपत्र निविदाधारकाकडे असले पाहिजे. नोंदणी तारखेपासून किमान पुढील 9 महिन्यांच्या कालावधीसाठी वैध असावी. निविदाधारकाने भारत सरकारव्दारे जारी केलेल्या सर्व भविष्यातील आवश्यकता/मागर्दर्शक तत्वे पूर्ण करण्यास सक्षम असावा. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 14) | निविदाधारकाकडे ई-कचऱ्याच्या व्यवस्थापनात काम केल्याचा किमान 3 वर्षांचा अनुभव असावा.( अनुभवाचा कालावधी हा व्यवसाय नोंदणीची तारीख असेल.) त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 15) | निविदाधारकाकडे किमान एका राष्ट्रीयकृत बँकेचा आणि सहकारी बँकेचा अथवा राज्य शासन/विद्यापीठाकडील पुनर्वापर केलेला ई-कचरा असावा. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 16) | ई-कचरा पुनर्वापरकर्ता म्हणून विस्तारीत उत्पादकाकडे CPCB कडील मान्यता असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 17) | निविदाधारकाने पुनर्वापरासाठीचा कोणत्याही किमान 3 शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार असावा. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 18) | निविदाधारकाने पुनर्वापरासाठीचा कोणत्याही एका विद्यापीठाशी सामंजस्य करार असावा. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 19) | निविदाधारकाने पुनर्वापरासाठीचा कोणत्याही उद्योगाशी सामंजस्य करार असावा. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 20) | निविदाधारकाकडे अधिकृत कंपनीसह Common Hazardous, Waste Collection, Treatment, Storage & Disposal Facilities (CHWTSDF)चे सदस्यत्व असावे. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 21) | निविदाधारकाने ई-कचऱ्याची विल्हेवाट लावल्यानंतर पुनर्वापराचे मुळ प्रमाणपत्र द्यावे लागेल. त्याबाबतचे दस्तऐवज सादर करावेत. | :- | |
| 22) | मागील 3 वर्षांत निविदाधारक कोणत्याही शासकीय/निमशासकीय/शासनअनुदानीत संस्थेत/आयटी उद्योग/सार्वजनिक बँका/नियामक/ वैधानिक संस्थेने काळया यादीत टाकलेले/प्रतिबंधित केलेले/अपात्र ठरविलेले नसावे अशा आशयाचे हमीपत्र सादर करावे. | :- | 0 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23) | साहित्य जमा करतेवेळी सर्व डेटा निष्क्रीय/पुसल्यानंतर आणि/किंवा स्टोरेज मिडीया नष्ट केल्यानंतर, कोणत्याही प्रक्रियेचा वापर करून डेटा पुनर्प्राप्त केला जाऊ शकत नाही अशा आशयाचे निविदाधारकाने हमीपत्र सादर करावे. | :- | |
| 24) | पुरवठादाराकडे वैध ISO प्रमाणपत्र सादर करावे. | :- | |

(अ.क्र. 5 ते 24 वरील मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाव्दारा ई-कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी प्रसिध्द निविदेतील उपरोक्त मागणी केलेल्या कागदपत्रांची/ माहितीची पुर्तता करणाऱ्या निविदाधारकांनी मागणी केलेली माहिती आवश्यक त्या दस्तऐवजांसह सादर करण्यात यावी.

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
**वित्त व लेखा अधिकारी,**
**कबचौउमवि, जळगांव**

निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

# जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

## भाग - 2

## निविदा अटी व शर्ती

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास ई-कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्यासाठी निविदेतील भाग-1 मध्ये प्रसिध्द केलेल्या **वर्णनानुसार निविदा मागविण्यात येत आहे. त्यासाठी सिलबंद पाकिटातून दि.13/08/2025 पर्यत कार्यालयीन वेळेत विद्यापीठाच्या वित्त विभागाच्या आवक विभागात (मुख्य प्रशासकीय इमारतीच्या कक्ष क्र.412) जमा करावे**.

## निविदे संबंधीच्या अटी व शर्ती

१) निविदेसोबत निविदा किंमत रू. 4,000/-(अक्षरी रू.चार हजार मात्र) व बयाणा रक्कम रू.20,000/-(अक्षरी रू.वीस हजार मात्र)चा मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव (Finance and Accounts Officer, K.B.C.N.M.U.,Jalgaon) यांच्या नावाने आय.सी.आय.सी.बँक, टाकरखेडा शाखा, जि.जळगाव चालू खाते क्रमांक 037501008945 (IFSC Code-ICIC0008464) या खाते क्रमांकावर ऑनलाईन भरणा करावी लागेल. अथवा निविदाधारक हे राष्ट्रीयकृत बँकेचे धनाकर्षाव्दारे (DD)सुध्दा भरणा करू शकतील. निविदा प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी निविदा शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहिल.

२) नोंदणीधारक निविदाधारकांचीच निविदा विचारात घेतली जातील.

३) सदरची संपूर्ण निविदा ही दोन भागात तांत्रिक निविदा (Technical Bid) व दरांची निविदा (Price Bid) मध्ये विभागलेली असून तांत्रिक निविदे अंतर्गत भाग 1 ते 3 (पा.क्र. 1 ते 11) मध्ये समाविष्ट आहेत व भाग-4 मध्ये (Price Bid) (पा.क्र. 12 ते 14) मध्ये समावेश आहे.

निविदा भाग 1 ते 3 मधील कागदपत्रे एका A-4 साईजच्या स्वतंत्र मोठया आकाराच्या पाकीटात टाकून त्यामध्ये दरांचा भाग-4 हा (पा.क्र. 12 ते 14) स्वतंत्र लहान आकाराच्या पाकीटात टाकून दोन्ही सिलबंद पाकिटे एकत्रितरित्या मोठ्या पाकीटात जमा करावेत. सिलबंद निविदा पाकिटावर **"जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

४) निविदा सादर करतेवेळी पाकिटे व्यवस्थित सिलबंद केलेली नसल्यास दरांची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

५) कोणत्याही कारणास्तव विहीत मुदतीनंतर उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

६) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाव्दारा ई-कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी प्रसिध्द निविदेतील उपरोक्त प्रमाणे मागणी केलेले दस्तऐवज हे विद्यापीठ संकेतस्थळ https://nmu.ac.in/en-us/वरून डाऊनलोड करून परिपूर्णरित्या माहिती भरल्यानंतर विहीत केलेल्या दिनांकास अथवा तत्पुर्वी जमा करणे आवश्यक राहिल. सदरच्या प्रसिध्द केलेल्या निविदेच्या अटी, शर्ती, तांत्रिक भागातील माहितीत कोणत्याही सुधारणा, फेरफार आणि कोणतेही कारणे न देता, निविदा प्रक्रियेतील कोणत्याही किंवा सर्व अटी, शर्तीमध्ये बदल अथवा सुधारणा करणे किंवा अंशत: बदलविणे/संपूर्णपणे बदलण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

त्यासाठी निविदाधारकांना वैयक्तीक स्वरुपात संप्रेषण पाठवले जाणार नाही, अथवा पत्रव्यवहार केला जाणार नाही. निविदेशी संबंधित निर्गमित केले जाणारे शुध्दीपत्रक,परिशिष्ट, दुरूस्त्या, वेळ विस्तार, स्पष्टीकरण, निविदाधारकांव्दारा उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नांना प्रतिसाद इ.माहिती असल्यास ते वर्तमानपत्र किंवा इतर कोणत्याही माध्यमातुन कोणत्याही जाहिरातीद्वारे प्रकाशित केले जाणार नाहीत. या संबंधात कोणत्याही प्रकारचे बदल/विकाससाठी निविदाधारकांनी नियमितपणे विद्यापीठाच्या वेबसाइटला भेट देणे आवश्यक राहील.

७) निविदाधारकांनी निविदा शुल्क आणि बयाणा शुल्क भरणा केल्याचा आवश्यक पुरावा म्हणून कागदपत्रे सादर करण्यात अयशस्वी झाल्यास निविदाधारक अपात्र ठरेल. निविदाधारकाने निविदा शुल्क आणि बयाणा शुल्कासाठी स्वतंतरित्या भरणा करणे आवश्यक राहील.

८) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट विद्यापीठातील ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निविदाधारकांस विद्यापीठाच्या परिसरामध्ये असलेल्या सर्व प्रशाळा/ विभाग/उपकेंद्रांमधून ई कचरा अनिवार्यपणे गोळा करणे आवश्यक राहिल.

९) विल्हेवाट करावयाच्या साहित्यासाठी ई-कचऱ्याची ओळख विद्यापीठाचे अधिकारी करतील. ई-कचरा अंतर्गत घ्यायच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांची सूचक यादी निविदेच्या भाग-3 मध्ये नमूद करण्यात आली आहे.

१०) विद्यापीठाला ई कचाऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्यासाठी प्रसिध्द केलेल्या निविदेतील दरांच्या भागात (पा.क्र. 12 ते 14) प्राप्त होणाऱ्या कमाल दरांनुसार (H-1- सर्वोच्च दर) विचारात घेतले जाईल.

११) विद्यापीठ कार्यालयाव्दारा ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत केली जाईल त्यांनी ई-कचरा संकलित करतांना देय होणाऱ्या संपूर्ण रक्कमेचा भरणा करावा लागेल. सदर रकमेवर केंद्र/राज्य शासनाव्दारे ठरविलेल्या नियमांनुसार कपाती बंधनकारक राहतील.

१२) ज्या निविदाधारकास ई-कचरा संकलन करून विल्हेवाट लावण्यासाठीच्या कार्यवाहीसाठीचा कार्यादेश/खरेदी आदेश निर्गमित केला जाईल त्यास करार केल्याच्या तारखेपासून 2 आठवडयांच्या आत ई कचरा गोळा करणे आवश्यक आहे.

१३) विल्हेवाटीसाठी ओळखल्या गेलेल्या संगणकांची हार्ड डिस्क फॉरमॅट केली गेली आहे/सर्व फाईल्स नष्ट करणे आवश्यक आहे. तसेच ई कचरा रिसायलिंग सुविधेतील हार्ड डिस्कमधून डेटा हटवण्यासाठी, विद्यापीठाकडून ई कचरा गोळा केल्यानंतर हार्ड डिस्क भौतिक क्रॅश होऊन नष्ट कराव्यात याबाबतची खातरजमा करून तसे प्रमाणपत्र संबंधित पुरवठादाराने सादर करणे आवश्यक राहिल.

१४) विद्यापीठाच्या ठिकाणाहून ई कचरा गोळा करण्यात कार्यादेश/खरेदी आदेश निर्गमित केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कमेचा विहीत कालावधीत भरणा न करणे, निर्धारित केलेल्या कालावधीत करारनामा सादर न करणे, विहीत कालावधीत साहित्याचे संकलन करण्यास टाळाटाळ/दिरंगाई करणे, निविदाधारकाकडून सेवा देण्याच्या संबंधाने विविध कारणे दर्शवून अडचणी निर्माण करणे व सहकार्य न करणे, विल्हेवाटीसाठीचे साहित्य संकलीत करून रक्कमेचा भरणा न करणे,निविदेतील प्रसिध्द अटी व शर्तीचे पालन न करणे इ. बाबींसंदर्भात कार्यादेश/खरेदी आदेश निर्गमित केलेल्या निविदाधारकाचा कार्यादेश/खरेदी आदेश रद्द करण्याचा विद्यापीठाचा अधिकार अबाधित असेल.

१५) सशर्त (Conditional) निविदा स्वीकारली जाणार नाही.

१६) ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृत होईल त्यांनी वार्षिक दर करार (ARC) करण्यास नकार दिल्यास किंवा हलगर्जीपणा/दिरंगाई केल्यास त्यांची बयाणा रक्कम (EMD) कायमस्वरूपी जप्त करण्यात येईल व त्यांच्या फर्मचे नाव कायमस्वरूपी काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात येईल.

१७) पर्यावरण आणि वन मंत्रालय, भारत सरकार आणि संबंधित राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळे किंवा इतर कोणत्याही नियामक प्राधिकरणाने वेळोवेळी ई कचऱ्याच्या विल्हेवाट लावण्यासाठी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे बोलीदाराने काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

१८) विद्यापीठ परीसरामध्ये ज्या ठिकाणी ई-कचरा तयार/संकलित केला गेला असेल, आणि तो विघटन/पुनर्वापर/अंतिम विल्हेवाट लावण्यासाठी दुसऱ्या स्थळी वा अन्य राज्यात नेणे आवश्यक असेल. तर त्यासाठी आवश्यक मान्यता/ ना हरकत प्रमाणपत्र घेणे ही बोलीदाराची जबाबदारी असेल. संबंधित राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ/केंद्रशासित प्रदेशाची प्रदूषण नियंत्रण समिती आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ/केंद्रशासित प्रदेशाच्या प्रदूषण नियंत्रण समितीला सध्या लागू असलेल्या आणि वेळोवेळी जारी केलेल्या Government Of India (GOI) मार्गदर्शक तत्वांनुसार आवश्यक आहे. ई-वे बिल (e-way bill) निर्मिती करणे निविदाधारकास बंधनकारक राहिल.

१९) ई कचऱ्याची सरकारने ठरवून दिलेल्या वेळेनुसार विल्हेवाट लावली पाहिजे. भारताची मार्गदर्शक तत्वे सध्या लागू आहेत/वेळोवेळी. अंतिम विल्हेवाट लावल्यावर,बोलीदाराने ई-कचरा मिळाल्यानंतर 45 दिवसांच्या आत विद्यापीठाला याबाबतचे प्रमाणपत्र प्रदान करणे आवश्यक आहे.

२०) विद्यापीठाच्या ठिकाणाहून निविदाधारककारकाच्या ठिकाणापर्यंत ई कचरा सुरक्षितपणे नेण्याची जबाबदारी ही संबंधित पुरवठादाराची असेल. ई कचऱ्याच्या संक्रमणा दरम्यान दुर्दैवाने कोणतीही अनुचित घटना घडल्यास, हानी/परिणामांसाठी सर्वस्वी/पूर्णपणे संबंधित निविदाधारक जबाबदार असेल. ई-कचरा हाताळणी प्रक्रियेदरम्यान लागणारे सर्व कर, शुल्क, परवाना शुल्क, रस्त परवाने,वाहतुक खर्च, इतर कर इ. साठी निविदाधारक हे पूर्णपणे जबाबदार असेल.

२१) उपरोक्त प्रसिध्द निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत सिलबंदरित्या जमा करावयाच्या निविदेच्या प्रत्येक पानावर संबंधित निविदाधारकाने सही व स्वाक्षरीनिशी निविदा सादर करणे आवश्यक राहिल.

२२) उपरोक्त निविदेशी निगडीत आवश्यक असलेल्या मुद्याच्या स्पष्टीकरणार्थ संबंधित सर्व संप्रेषणे आणि कोणतीही शंका असल्यास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, पी.ओ.बॉक्स न. 80, उमविनगर, जळगांव 425001 (महाराष्ट्र) या पत्यावर लिखित स्वरूपात पाठविता येईल अथवा fao@nmu.ac.in/ po@nmu.ac.in या ई-मेल वर पाठविता येईल.

| **निवेदविषयक तपशील** | **पासुन** | **पर्यंत** |
|---|---|---|
| निविदा प्रसिध्दीची तारीख | दि. 23/07/2025 | - |
| निविदा सादर करण्याची शेवटीची तारीख | दि. 24/07/2025 | दि.13/08/2025<br>सायंकाळी 05.40 पर्यंत |
| निविदेचा तांत्रिक भाग उघडविण्याची अपेक्षीत तारीख | -- | दि. 19/08/2025 |
| दरांचा भाग उघडविण्यापूर्वीची सभा (ऑनलाईन/ऑफलाईन) (Pre-Bid Meeting) | स्वतंत्ररित्या तारीख व वेळ कळविण्यात येईल | |
| निविदेच्या दरांचा भाग उघडविण्याची अपेक्षीत तारीख | -- | दि. 25/08/2025 |

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
**वित्त व लेखा अधिकारी,**
**कबचौउमवि, जळगांव**

निविदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकाचे नाव,सही व शिक्का.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

# जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

## भाग - 3

विद्यापीठ कार्यालयाच्या स्थापनेपासून ते आजमितीपर्यंत संकलीत केलेले जुने, कालबाह्य,वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी "**ज्या स्थितीतील आहे तश्याच स्थितीतील**" संकलीत केलेले साहित्य विद्यापीठाच्या गोडाऊन मध्ये जमा केलेले आहेत. तसेच काही साहित्य विविध प्रशाळा/ प्रशासकीय विभागांमधुन जमा करावयाचे आहेत. त्यासाठी खालील नमुद वर्णनाबरहुकूम ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी इच्छुक असलेल्या निविदाधारकांनी सदरच्या निविदेत सहभाग नोंदवावयाचा आहे.

**संकलीत केलेल्या साहित्याचा तपशील येणेप्रमाणे** :-

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| 1 | संगणक CPU | नग | 3000 |
| 2 | संगणक मॉनीटर CRT | नग | 2000 |
| 3 | मॉनीटर | नग | 1500 |
| 4 | कि बोर्ड | नग | 4000 |
| 5 | माऊस | नग | 1000 |
| 6 | एलसीडी | नग | 10 |
| 7 | प्रिंटर्स् | नग | 400 |
| 8 | स्कॅनर | नग | 08 |
| 9 | फोटोकॉपीअर मशीन्स | नग | 02 |
| 10 | आयटी उपकरणे | नग | 200 |
| 11 | प्रिंटरचे वापरलेले टोनर | नग | 800 |
| 12 | डॉट मॅट्रीक्स प्रिंटरचे जुने कार्टेज | नग | 400 |
| 13 | प्रिंटर्सचे वापरलेले ड्रम | नग | 350 |
| 14 | फोटोकॉपीअर मशीनचे वापरलेले टोनर | नग | 800 |
| 15 | फोटोकॉपीअर मशीनचे वापरलेले ड्रम | नग | 365 |
| 16 | जुने वॉटर कुलर्स | नग | 25 |
| 17 | जुने डेझर्ट कुलर | नग | 06 |
| 18 | जुने आर.ओ. सिस्टीम्स | नग | 10 |
| 19 | जुने स्प्लिट एअरकंडिशनर्स | नग | 20 |
| 20 | जुने विंडो एअरकंडिशनर्स 1.5 टन क्षमता | नग | 20 |
| 21 | जुने डिप फ्रिजर्स | नग | 2 |
| 22 | जुने वॉशींग मशीन | नग | 2 |
| 23 | जुने रेफ्रिजरेटर्स् | नग | 5 |

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| 24 | CAT 6 केबल्स | किलो ग्रॅम | 100 |
| 25 | जुने पाण्याचे जुने प्लॉस्टीक चे जार | नग | 1500 |
| 26 | जुने एल सी डी प्रोजेक्टर | नग | 4 |
| 27 | जुने Birla Yamaha जनरेटर्स् | नग | 2 |
| 28 | जुने युपीएस- लहान | नग | 4 |
| 29 | जुने युपीएस- मोठे | नग | 2 |
| 30 | Old Auto Cloves | नग | 5 |
| 31 | Over head Projector | नग | 2 |
| 32 | Old Mixer | नग | 2 |
| 33 | Voltage Stabilizer | नग | 10 |
| 34 | Old Microscopes | नग | 13 |
| 35 | टयुब रॉड 20 वॅट | नग | 2000 |
| 36 | टयुब रॉड 20 वॅट/36 वॅट/40 | नग | 5000 |
| 37 | सी.एफ.एल./जी.एल.एस./एच.पी.एस.व्ही.बल्व | नग | 1000 |
| 38 | प्लास्टिक मटेरीयल | किलोग्राम | 50 |
| 39 | लोखंडी मटेरीयल (पत्रा प अँगल सहीत) | किलोग्राम | 100 |
| 40 | कॉपर केबल्स /वायर्स इन्सुलेशनसह | किलोग्राम | 50 |
| 41 | ॲल्यूमिनीयम केबल्स/वायर्स इन्सुलेशनसह | किलोग्राम | 100 |
| 42 | कॉपर चोक (संपूर्ण मटेरीयलसह ) | किलोग्राम | 100 |
| 43 | ॲल्यूमिनीयम चोक (संपूर्ण मटेरीयलसह ) | किलोग्राम | 100 |
| 44 | जुने सिलींग फॅन | नग | 50 |
| 45 | जुने एनर्जी मिटर्स् | नग | 50 |
| 46 | इलेक्ट्रिक गिझर्स 3 लिटर | नग | 5 |
| 47 | इलेक्ट्रिक गिझर्स 10 ते 15 लिटर | नग | 8 |
| 48 | पुठ्ठे | किलोग्राम | 50 |
| 49 | ॲसिड बॅट-या<br>i)40AH<br>ii)72 AH<br>iii)100AH<br>iv)150AH<br>v) 200AH | <br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग | <br>20<br>30<br>5<br>5<br>30 |
| 50 | TV Show Case | नग | 1 |
| 51 | Computer Table | नग | 15 |
| 52 | लोखंडी जुने पलंग | नग | 14 |
| 53 | Hot Air Oven | नग | 2 |
| 54 | Wooden Notice Board | नग | 3 |

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या |
|---|---|---|---|
| 55 | Four Seater Table | नग | 4 |
| 56 | Balance | नग | 13 |
| 57 | Incubator | नग | 4 |
| 58 | Vacuum Pump | नग | 3 |
| 59 | Generator used Oil | लिटर | 300 |
| 60 | Generator used Oil Filters | नग | 25 |

*उपरोक्त साहित्याचे संकलन मोठया प्रमाणात गोडाऊनमध्ये केल्यामुळे साहित्याची संख्या निश्चित करता येत नाही.

**(सीए रविंद्र ना. पाटील)**
**वित्त व लेखा अधिकारी,**
**कबचौउमवि, जळगांव**

निविदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबत निविदाधारकाचे नाव, सही व शिक्का

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## जुने, कालबाह्य, वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाटीसाठीची निविदा.

### भाग - 4

### दरांचा भाग- (Price-Bid)

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कार्यालयातील जुने,कालबाह्य,वापरता न येणारे संगणक, प्रिंटर्स, आयटी उपकरणे व इलेक्ट्रॉनिक्स वस्तुंच्या ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी "**ज्या स्थितीतील आहे तश्याच स्थितीतील**" विद्यापीठाच्या गोडाऊन मध्ये संकलीत केलेले व प्रशाळा / प्रशासकीय विभागांमधून स्वखर्चाने जमा करावयाच्या खालील तक्त्यात नमुद केलेल्या वर्णनाबरहुकूम ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मी/आम्ही ------------------------------------ हे निविदाधारक स्वेच्छेने सदरच्या निविदेत सहभाग नोंदवित आहे. विद्यापीठ कार्यालयाव्दारा प्रसिध्द केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य असून त्यानुसार तांत्रिक भागातील मागणी केलेले सर्व कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी मी/आम्ही तयार असुन तांत्रिकदृष्टया आमच्या फर्म/कंपनीची पात्र ठरल्यास खालील तक्त्यातील दर्शविलेले सर्व साहित्य खरेदीसाठी दरांच्या भागात (Price-Bid) दर नमुद करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या | दर प्रती नग |
|---|---|---|---|---|
| 1 | संगणक CPU | नग | 3000 | |
| 2 | संगणक मॉनीटर CRT | नग | 2000 | |
| 3 | मॉनीटर | नग | 1500 | |
| 4 | कि बोर्ड | नग | 4000 | |
| 5 | माऊस | नग | 1000 | |
| 6 | एलसीडी | नग | 10 | |
| 7 | प्रिंटर्स् | नग | 400 | |
| 8 | स्कॅनर | नग | 08 | |
| 9 | फोटोकॉपीअर मशीन्स | नग | 02 | |
| 10 | आयटी उपकरणे | नग | 200 | |
| 11 | प्रिंटरचे वापरलेले टोनर | नग | 800 | |
| 12 | डॉट मॅट्रीक्स प्रिंटरचे जुने कार्टेज | नग | 400 | |
| 13 | प्रिंटर्सचे वापरलेले ड्रम | नग | 350 | |
| 14 | फोटोकॉपीअर मशीनचे वापरलेले टोनर | नग | 800 | |
| 15 | फोटोकॉपीअर मशीनचे वापरलेले ड्रम | नग | 365 | |
| 16 | जुने वॉटर कुलर्स | नग | 25 | |
| 17 | जुने डेझर्ट कुलर | नग | 06 | |
| 18 | जुने आर.ओ. सिस्टीम्स | नग | 10 | |
| 19 | जुने स्प्लिट एअरकंडिशनर्स | नग | 20 | |
| 20 | जुने विंडो एअरकंडिशनर्स 1.5 टन क्षमता | नग | 20 | |
| 21 | जुने डिप फ्रिजर्स | नग | 2 | |
| 22 | जुने वॉशींग मशीन | नग | 2 | |

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या | दर प्रती नग |
|---|---|---|---|---|
| 23 | जुने रेफ्रिजरेटर्स् | नग | 5 | |
| 24 | CAT 6 केबल्स | किलो ग्रॅम | 100 | |
| 25 | जुने पाण्याचे जुने प्लॅस्टीक चे जार | नग | 1500 | |
| 26 | जुने एल सी डी प्रोजेक्टर | नग | 4 | |
| 27 | जुने Birla Yamaha जनरेटर्स् | नग | 2 | |
| 28 | जुने युपीएस- लहान | नग | 4 | |
| 29 | जुने युपीएस- मोठे | नग | 2 | |
| 30 | Old Auto Cloves | नग | 5 | |
| 31 | Over head Projector | नग | 2 | |
| 32 | Old Mixer | नग | 2 | |
| 33 | Voltage Stabilizer | नग | 10 | |
| 34 | Old Microscopes | नग | 13 | |
| 35 | टयुब रॉड 20 वॅट | नग | 2000 | |
| 36 | टयुब रॉड 20 वॅट/36 वॅट/40 | नग | 5000 | |
| 37 | सी.एफ.एल./जी.एल.एस./एच.पी.एस.व्ही.बल्व | नग | 1000 | |
| 38 | प्लास्टिक मटेरीयल | किलोग्राम | 50 | |
| 39 | लोखंडी मटेरीयल (पत्रा प अँगल सहीत) | किलोग्राम | 100 | |
| 40 | कॉपर केबल्स /वायर्स इन्सुलेशनसह | किलोग्राम | 50 | |
| 41 | अॅल्यूमिनीयम केबल्स/वायर्स इन्सुलेशनसह | किलोग्राम | 100 | |
| 42 | कॉपर चोक (संपूर्ण मटेरीयलसह ) | किलोग्राम | 100 | |
| 43 | अॅल्यूमिनीयम चोक (संपूर्ण मटेरीयलसह ) | किलोग्राम | 100 | |
| 44 | जुने सिलींग फॅन | नग | 50 | |
| 45 | जुने एनर्जी मिटर्स् | नग | 50 | |
| 46 | इलेक्ट्रिक गिझर्स 3 लिटर | नग | 5 | |
| 47 | इलेक्ट्रिक गिझर्स 10 ते 15 लिटर | नग | 8 | |
| 48 | पुठ्ठे | किलोग्राम | 50 | |
| 49 | अॅसिड बॅट-या<br>i)40AH<br>ii)72 AH<br>iii)100AH<br>iv)150AH<br>v) 200AH | <br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग<br>प्रतीनग | <br>20<br>30<br>5<br>5<br>30 | |
| 50 | TV Show Case | नग | 1 | |
| 51 | Computer Table | नग | 15 | |
| 52 | लोखंडी जुने पलंग | नग | 14 | |

| अ.क्र. | साहित्याचे नांव | युनिट | अंदाजे संख्या | दर प्रती नग |
|---|---|---|---|---|
| 53 | Hot Air Oven | नग | 2 | |
| 54 | Wooden Notice Board | नग | 3 | |
| 55 | Four Seater Table | नग | 4 | |
| 56 | Balance | नग | 13 | |
| 57 | Incubator | नग | 4 | |
| 58 | Vacuum Pump | नग | 3 | |
| 59 | Generator used Oil | लिटर | 300 | |
| 60 | Generator used Oil Filters | नग | 25 | |

निविदाधारकाची सही :- --------------------------------

निविदाधारकाचे नाव :- --------------------------------

शिक्का :-